RESEARCH FRONT
ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# शिक्षक शिक्षण संस्थांमधील नवोपक्रम

**प्रा.डॉ.के.आर.पाटील**
सहाय्यक प्राध्यापक,
डॉ.डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ
एज्यूकेशन, गारगोटी

**प्रा.सौ.के.एस्.मोरे**
सहाय्यक प्राध्यापक,
डॉ.डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ
एज्यूकेशन, गारगोटी

प्रस्तावना

भारत हा विकसनशील देश आहे. विकसनशील देशाच्या अनेक गरजा असतात. या गरजांची पूर्तता करण्यासाठी विविध प्रकारे उपाययोजना करावी लागते. यासाठी विकासाची प्रक्रिया असावी लागते. शिक्षणक्षेत्र हे अन्य सर्व क्षेत्रांचे ''मार्गदर्शक क्षेत्र'' म्हणून ओळखले जाते. अर्थातच राष्ट्रीय जीवनाचा स्तर उंचावण्यासाठी शिक्षणाचा दर्जा उंचावणे आवश्यक असते. शिक्षक हा संपूर्ण शिक्षण प्रणालीचा मुख्य आधार आहे.

भारतात शिक्षकाचे स्थान समाजात वरच्या दर्जाचे आहे. गुरुकुल पद्धती आणि वाड्.मयाची परंपरा उज्वल आहे. गुरुकुल पद्धतीत शील संवर्धन, व्यक्तीविकास, व्यावसायिक निती, समाजऋण, गुरुशिष्यनाते या परंपरा सांगता येतील. सदरहू परंपरा आश्रम, मठ, विहार, पाठशाळा या संस्थातून शिकवली जात होती. प्राचीन विद्याकेंद्र, तक्षशीला, नालंदा, विक्रमशीला, काशी, कांची इत्यादी प्रसिद्ध होती.

अध्यापक किंवा आचार्य व प्रशिक्षणार्थी एकत्र रहात. वैदिक ग्रंथामध्ये चार वेद व त्यांचे उपवेद, आरण्यके, उपनिषदे, ब्राह्मणके या ग्रंथांचा समावेश असे, मुद्रणकला नसल्याने पाठांतराच्या सहाय्याने ज्ञानाचा वापर होत असे. कृतीने सर्व वर्तमान बदल गुरुच्या देखरेखीखाली चालत असे व शिक्षणक्रम पूर्ण होई.

मुस्लीम व इतर परकीयांच्या आक्रमक हालचालीमुळे प्राचीन परंपरा खंडीत झाली. शिक्षकांना इतर विषय शिकविण्यास भाग पडले. इंग्रज राजवटीला सुरुवात झाली आणि शिक्षकांची गुणवत्ता, प्रशिक्षण या गोष्टींचा विचार होवू लागला. इंग्रजी भाषेबरोबर शिक्षकांना इतर विषयज्ञान आवश्यक होवू लागले.

शिक्षक तयार करण्यासाठी वेगवेगळ्या आयोगांनी विचार व्यक्त केले. यामध्ये स्वातंत्र्यपूर्व कालखंड व स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये यावर विचार विनिमय होवून वेगवेगळ्या प्रशिक्षण संस्थांची स्थापना करणेत येवू लागली. प्रशिक्षण संस्थांमधून दर्जेदार व गुणवत्ता पूर्ण शिक्षक तयार करण्यासाठी योजना तयार करण्यात आली. प्राथमिक स्तरावरील शिक्षकापासून ते पदव्युत्तर स्तरापर्यंतचा शिक्षक तयार करण्यासाठी प्रशिक्षण विद्यालय, महाविद्यालयीन आणि विभाग सुरु करणेत आले. यातून शिक्षक प्रशिक्षणार्थींच्या शिक्षणाची सोय करण्यात आली.

शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयात, विभागात शिकण्यासाठी आलेल्या प्रशिक्षणार्थीला विषय ज्ञानाबरोबर अध्यापन कौशल्य शिकविण्यासाठी अभ्यासक्रमाची विशिष्ट रचना करण्यात आली. प्रशिक्षण संस्थांमधून तयार होणारा शिक्षक हा दर्जेदार व गुणवत्तापूर्ण तयार करण्यासाठी प्रशिक्षण संस्थाही तेवढ्याच दर्जेदार व गुणवत्तापूर्ण असणे आवश्यक आहे. यासाठी प्रशिक्षण संस्थांमध्ये विविध नवोपक्रम आयोजन करणे आवश्यक आहे.

शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयांची शिक्षक तयार करण्याची प्रक्रिया पृष्ठ क्रमांक 3 वर स्पष्ट केली आहे. या प्रक्रियेतून बाहेर पडणारा शिक्षक हा गुणवत्तापूर्ण होण्यासाठी प्रशिक्षण प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर आपण नवीन उपक्रमांचे आयोजन करणे गरजेचे आहे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

1) संस्था वातावरण – शिक्षक प्रशिक्षण संस्थांमधील प्रशिक्षणार्थीसाठी आदर्श सराव उपलब्ध करुन देणे, त्याचबरोबर आदर्श नमुना दाखविणेची गरज आहे. सर्व सराव हा नैसर्गिक परिस्थितीत करावा. शिक्षक व विद्यार्थी शिक्षक यांना उल्हासित करणारे अनुभव उपलब्ध करणे, शिक्षक प्रशिक्षकांनी आपल्या कार्यामध्ये चांगले अंर्तज्ञान प्राप्त करावे, प्रशिक्षण संस्थेत काम करणाऱ्या प्रत्येक सहकाऱ्यामध्ये विचारांची देवाण–घेवाण झाली पाहिजे. संस्थांतर्गत वातावरण चांगले असणे गरजेचे आहे. संस्थेत व्यावसायिक दृष्टीने काही उपक्रम राबवावेत. प्रत्येक व्यक्तीत जागरुकता असली पाहिजे. संस्थेची गुणवत्ता वाढावी यासाठी प्रत्येक व्यक्तीने प्रयत्न करणेची गरज आहे.

2) प्रत्येक शिक्षक प्रशिक्षण संस्थेत गुणवत्ता परिमाणे पुनरावलोकन करण्यासाठी एक अंतर्गत दर्जाचे आश्वासन सेल (IQAC) स्थापन करणे आवश्यक आहे. यामुळे गुणवत्ता सुधारण्यासाठी विविध मार्गाचा वापर केला जातो. यामार्फत शैक्षणिक आणि प्रशासनिक कामाची तपासणी केली जाते.

3) शिक्षक प्रशिक्षण संस्थेची ध्येयधोरणे, उद्दीष्टे स्पष्टपणे तेथील काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीमध्ये रुजविण्याचा प्रयत्न करणे. संस्थेची उद्दिष्टे ही प्रादेशिक आणि राष्ट्रीय विचारांशी सुसंगत असावीत.

4) प्रशिक्षण संस्थेत राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमासंदर्भात उजळणी वर्गाचे आयोजन करण्यात यावे.

5) प्रशिक्षण संस्थेचे कामकाज विद्यार्थी प्रवेशापासून नियोजनबद्ध असावे. तसेच काही बाबतीत लवचिकता असावी.

6) सैद्धांतिक भाग व प्रात्यक्षिकांची सांगड घालण्यात यावी. प्रत्येक घटकाचे प्रात्यक्षिक योग्यवेळी घेण्यात यावे. सैद्धांतिक भाग व प्रात्यक्षिक कार्य यांची फारकत होता कामा नये.

7) शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयात शिकणाऱ्या प्रशिक्षणार्थीकडून शिक्षण प्रक्रियेबाबत प्रत्याभरण घ्यावे. यामुळे अध्यापक व प्रशासन यांना आपल्यात बदल करण्याची संधी मिळते.

8) विद्यार्थ्याला वैयक्तिक अनुभव घेण्याची संधी द्यावी.

9) आपल्या प्रशिक्षण संस्थेला भारतातील तसेच परदेशातील अन्य संस्थेबरोबर सहकार्य संबंधी करार करण्यासाठी प्रयत्न करावेत.

10) प्रशिक्षण संस्थेत विविध प्रकारच्या आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय परिषदा, कार्यशाळा आणि सेमीनार यांचे आयोजन करावे.

11) शिक्षण प्रशिक्षकाकडून दाखविले जाणारे आदर्श डेमो/नमुने यांचे रेकॉर्डिंग करुन घेण्याची व्यवस्था करावी. तसेच विद्यार्थ्यांना प्रत्याभरण देताना तंत्रज्ञानाचा वापर करण्यात यावा.

12) शिक्षक प्रशिक्षण संस्था या राजकीय दबावापासून दूर असाव्यात.